


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २९५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०६ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## फडणवीस सरकारचा मोठा निर्णय; मराठा समाजाला योजनांचा लाभ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ओबीसी समाजाला मिळणाऱ्या विविध योजनांच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल आठ कल्याणकारी योजना सुरू करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता, त्यानंतर आता शैक्षणिक सवलतींसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा मोठा आणि ऐतिहासिक असा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील विद्यार्थी, युवक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयानुसार मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे कोणत्या योजना लागू केल्या गेल्या आहेत, पाहुयात




**शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना**

दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. सध्या ही योजना ओबीसी विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

**वाहन चालक आणि वाहक प्रशिक्षण योजना**

मराठा समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक आणि वाहक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती**

इयत्ता नववी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही लागू होणार आहे.

**शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती**

उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या विविध शुल्कांची रक्कम शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना परत दिली जाणार आहे. यामध्ये विविध शैक्षणिक खर्चांचा समावेश असेल.

**परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ**

महाराष्ट्रातील मराठा विद्यार्थी राज्याबाहेरील अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यास त्यांनाही या योजनेचा लाभ मिळेल.

**सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पात्रता**

ओबीसी विद्यार्थ्यांना ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सवलती मिळतात, त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठा समाजातील विद्यार्थीही पात्र राहतील.

संस्थास्तरावरील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही लाभ

केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती मिळतील.

**भविष्यातील सर्व नवीन सवलती आपोआप लागू**

यापुढे ओबीसी प्रवर्गासाठी ज्या नवीन शैक्षणिक सवलती किंवा सुविधा जाहीर केल्या जातील, त्या स्वतंत्र आदेशाशिवाय मराठा समाजालाही आपोआप लागू होतील. ही या निर्णयातील सर्वात महत्त्वाची तरतूद मानली जात आहे.

**निर्णयावरून वादाची ठिणगी!**

दरम्यान, सरकारच्या या निर्णयावरुन ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आक्षेप नोंदवला असून, ओबीसी समाजासाठी लागू असलेल्या योजनांचा विस्तार मराठा समाजापर्यंत करताना मूळ लाभार्थ्यांच्या हक्कांवर परिणाम होणार नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

**'ओबीसींच्या हक्कांवर गदा आणणारा निर्णय'**

मराठा समाजासाठी लोककल्याणकारी महाराष्ट्राच्या संकल्पनेतून कोणाची मागणी आली आणि त्यांच्या मागण्या पूर्ण करणे हा शासनाचा अधिकार आहे. पण ज्यावेळी ओबीसी आरक्षणाच्या धर्तीवरील सवलती मराठा समाजाला दिल्या जातात, त्यावेळी त्या ओबीसींच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या ठरू शकतात. लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून कोणाला काय द्यायचे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र जे मोर्चे काढू शकतात, सरकारवर दबाव आणू शकतात, त्यांच्या मागण्यांकडे अधिक गांभीर्याने पाहिले जाते. घटनात्मक पाया तपासल्याशिवाय निर्णय घेतले जातात, ही चिंतेची बाब आहे. ओबीसींसाठी असलेल्या योजनांमधून मराठा समाजाला लाभ देणे म्हणजे मूळ ओबीसी समाजावर अन्याय करणारे ठरू शकते, असे हाके म्हणाले.

**'हे राज्य फक्त मराठ्यांचे आहे का?'**

पुढे बोलताना त्यांनी सांगितलं की, या निर्णयाचे स्वागत करण्यासारखे काहीही नाही. महाराष्ट्रात भटके, ओबीसी, दीनदलित असे अनेक समाजघटक आजही सामाजिक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र त्यांच्या मागण्यांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. जे आंदोलन करू शकतात, त्यांच्याच मागण्या वारंवार मंजूर होताना दिसतात. निवडणुकांवर प्रभाव टाकणाऱ्या सम ाजघटकांसाठी राज्याची तिजोरी खुली करायची का? सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सरकार कधी बोलणार? महाराष्ट्र हे एका समाजाचे राज्य नाही. राज्यात सर्वाधिक लोकसंख्या ओबीसी समाजाची आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना सर्व घटकांचा विचार होणे आवश्यक आहे.

**जरांगेच्या आंदोलनानंतर आला निर्णय!**

दरम्यान, मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांनी अलिकडेच आंदोलन केले होते. हे आंदोलन १० मागण्यांसाठीचे आमरण उपोषण होते, रखरखत्या उन्हात सुरू केलेल्या या उपोषणादरम्यान सरकारने सकारात्मक निर्णयाचे आश्वासन दिल्यानंतर मध्यरात्री हे उपोषण स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर राज्यसरकारकडून हा मोठा निर्णय आला आहे.

## खडकवाडी येथील महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वनकुटे व परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या कमी दाबाच्या व वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याविरोधात गुरुवारी खडकवाडी येथील महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले. विजेअभावी शेतपिकांचे मोठे नुकसान होत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी महावितरणविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन छेडले.

आंदोलनादरम्यान टोमॅटो पीक जळाल्याने व्यथित झालेल्या राजेंद्र इरोळे या शेतकऱ्याने विजेच्या पोलवर चढून आंदोलन करण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. अखेर वनकुटेसाठी स्वतंत्र फिडर देण्याचे लेखी आश्वासन महावितरणकडून मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.वनकुटे व परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले की, गेल्या पंधरा दिवसांपासून परिसरात अत्यंत कमी दाबाने वीजपुरवठा होत असून दर काही मिनिटांनी वीज खंडित होत आहे. त्यामुळे कृषी पंप बंद पडत असून पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने टोमॅटो, भाजीपाला व अन्य नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने अखेर शेतकऱ्यांनी एकत्र येत खडकवाडी वीज केंद्रावर ठिय्या आंदोलन सुरू केले.

आंदोलनादरम्यान महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. वीजपुरवठ्याबाबत विचारणा केली असता केवळ बिघाड झाला आहे, असे सांगितले जाते; मात्र तो दुरुस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत,असा आरोप करण्यात आला. शेतकऱ्यांना वेळेवर बिले भरण्याची अपेक्षा करणाऱ्या महावितरणने दर्जेदार वीजपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात ऍड. राहुल झावरे, दिपक गुंजाळ, शिवाजी बरकडे, पांडुरंग बेलकर, राजेंद्र इरोळे, अनिल काकडे, राहुल गुंजाळ,चिवा औटी, तात्या म ुसुळे,शरद आग्रे, सोमनाथ मुसळे,राजू डहाळे, देविदास वाबळे,सनी इरोळे, किरण शिंदे, राजेंद्र शिंदे, अनिल शिंदे, किरण शिंगटे,पवन इरोळे, अजित गुंजाळ, सतिश साबळे,भिवा बरकडे, संतोष डोके, आकाश झावरे, दादा गुंजाळ अजित वाळुंज यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

❝माजी सरपंच ऍड. राहुल झावरे यांनी आंदोलनात सहभागी होत शेतकऱ्यांच्या मागण्यांचे समर्थन केले. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वनकुटे परिसरातील वीज समस्येबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. गारपीट व अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यानंतर वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी मिळालेल्या निधीचा योग्य वापर झाला का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आंदोलनांची तीव्रता वाढत असताना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा केली. वनकुटे गावासाठी स्वतंत्र फिडर उभारण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल तसेच त्यासंदर्भात लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून एफएल ३ परवान्यांची खैरात!

मोतीलाल वाईन शॉपला एफएल ३ ची परवानगी आहे याठिकाणी काही बेकायदेशीर आढळल्यास चौकशी करू.

**– योगेश यलसतवाड (उपनिरीक्षक)**
**राज्य उत्पादन शुल्क विभाग सावनेर ३ कळमेश्वर**

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** नागपूर ग्रामीण भागात राज्य उत्पादन शुल्क विभागाने सर्व नियम आणि कायद्यांना हरताळ फासत दोन डझनहून अधिक एफएल ३ (परमिट रूम) परवान्यांची खैरात वाटल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या आर्थिक लाभाच्या धोरणामूळे खापरखेडा परिसरासह ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांची विशेषतः महिला व विद्यार्थ्यांची सुरक्षा आता पूर्णपणे ऐरणीवर आली आहे.

खापरखेडा परिसरात आधीच एका डझनपेक्षा जास्त बिअर बार, चार-पाच देशी दारूची दुकाने व एक वाईन शॉप सुरू आहे यातील बहुतांश दुकाने मुख्य बाजारपेठेत आहेत. यात आता भर म्हणून मुख्य बाजारपेठेत असलेल्या मोतीलाल वाईन शॉप ला राज्य उत्पादन शुल्क विभागाने नुकतीच एफएल ३ ची परवानगी बहाल केली आहे. वास्तविक पाहता वाईन शॉपमधून ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त किंमत न घेता दारू विकणे बंधनकारक आहे.

मात्र, ग्राहकांकडून चढ्या भावाने पैसे उकळण्याच्या उद्देशाने सदर वाईन शॉप म ालकाने दुकानाच्या मागेच तळीरामांसाठी चक्क एक 'हॉल' उपलब्ध करून दिल्याचा गंभीर आरोप होत आहे. परमिट रूमच्या नावाखाली याठिकाणी सर्रासपणे बेकायदेशीर कृत्य सुरू असून याला राज्य उत्पादन शुल्क विभागाचा मूक आशीर्वाद असल्याचे बोलले जात आहे.



कोणत्याही भागात एफएल ३ दारू दुकानाचा परवाना देण्यापूर्वी स्थानिक ग्राम पंचायतीचे 'ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असते शिवाय स्थानिक पोलिसांचा कायदा व सुव्यवस्थेबाबतचा अहवाल अपेक्षित असतो याउलट परिसरातील नागरिकांच्या हरकती व सूचना मागवणे बंधनकारक असते, मात्र आर्थिक लाभापोटी राज्य उत्पादन शुल्क विभागाने सर्व नियम धाब्यावर बसवून स्थानिक प्रशासन व नागरिकांना अंधारात ठेवून म ोतीलाल वाईन शॉपला एफएल ३ चा परवाना बहाल करण्यात आल्याचा आरोप होतो आहे. मंजुरीसाठी लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

मोतीलाल वाईन शॉपच्या मागे एफएल ३ चा कारभार सुरू करण्यात आला आहे. हा परिसर संवेदनशील आहे, या भागात विद्यार्थ्यांचे शिकवणी वर्ग, ब्युटी पार्लर, लहान मोठी दुकाने आहेत, शिवाय नागरिकांची दाट वस्ती आहे, पार्किंगची व्यवस्था तळ ठोकून आहे, दिवसभर तळीरामांच्या वावरामूळे या भागात महिला, विद्यार्थी व नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. प्रशासनाने तात्काळ या प्रकरणाची दखल घेऊन मोतीलाल वाईन शॉपला दिलेली एफएल ३ ची परवानगी रद्द करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## मुंबईत १ जुलैपासून रिक्षा प्रवास महागणार

**अक्षराज : संजय पंडित**



**दि.०५, मुंबई :** इंधन दरवाढीचा फटका आता थेट मुंबईकरांच्या दैनंदिन प्रवासावर बसण्याची चिन्हे दिसत आहेत. एलपीजी आणि पीएनजीनंतर आता रिक्षा प्रवासही महाग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सीएनजी दरवाढीमुळे मुंबईतील रिक्षा भाडेवाढीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास १ जुलैपासून किमान भाडे २३ रुपयांवरून थेट २७ रुपये होणार असून यामुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

मुंबईत प्रामुख्याने उपनगरातील लाखो प्रवाशांना रोज इच्छित स्थळी पोहचविणारी रिक्षा आता सर्व सामन्यांच्या खिशाला मोठा फटका देण्याच्या तयारीत आहे.आधीच वाढत्या महागाईने समस्त मुंबईकरांचे कंबरडे मोडले असताना आता रिक्षा भाडेवाढीचा नाव अधिकचा नवा भार पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान मुंबई महानगर प्रदेशातील रिक्षा भाडेवाढीच्या या प्रस्तावाला कम ालीची गती मिळाली असून हा प्रस्ताव आता निर्णयाच्या अगदी उंबरठ्यावर पोहोचला आहे. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत यावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असून, लवकरच मुंबईकरांचा रिक्षा प्रवास महागणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

दरम्यान या संभाव्य भाडेवाढीच्या मागे सीएनजी दरांमध्ये झालेली सातत्यपूर्ण वाढ हे मुख्य कारण असल्याचे सांगितले जात आहे. काही दिवसांपूर्वीच राज्यभरात स्कूल बसच्या दरांमध्ये वाढ जाहीर करण्यात आली होती, आणि आता त्याचाच पुढचा भाग म्हणून रिक्षा भाडेवाढीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मुंबई रिक्षामेन्स युनियनने या संदर्भात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे एक सविस्तर निवेदन सोपवले आहे. सीएनजीचे दर वाढल्यामुळे सध्याच्या भाड्यात रिक्षा चालवणे आणि कुटुंबाचा गाडा हाकणे अत्यंत कठीण झाल्याचा दावा रिक्षाचालक संघटनांकडून केला जात आहे. त्यामुळे ही भाडेवाढ तातडीने लागू करावी, यासाठी जवळ जवळ सर्वच रिक्षाचालक संघटना प्रचंड आग्रही आहेत.

## लासलगावात अन्न व औषध प्रशासनाचा छापा; सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, लासलगाव (नाशिक) :** अन्न व औषध प्रशासन (FDA) नाशिकच्या पथकाने लासलगाव परिसरामध्ये एक मोठी कारवाई करत छापा टाकला आहे. या धडक कारवाईत सुमारे १ लाख २३ हजार ५९४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात मुख्य आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

**मध्यरात्री पोलिसांत गुन्हा दाखल**

मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात शुक्रवार, दिनांक ०५ जून २०२६ रोजी पहाटे ०२:१० वाजता गुन्हा नोंदवण्यात आला आहे. (गुन्हा रजिस्टर नंबर १७५/२०२६).

**'या' कडक कलमांन्वये कारवाई**

अन्नसुरक्षा आणि मानके कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रशासनाने अत्यंत कडक पावले उचलली आहेत. आरोपीविरुद्ध खालील कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे:

अन्नसुरक्षा आणि मानके अधिनियम: ३०(२)(र), २६(२)(i), २६(iv), २७(३)(d), २७(३)(e), ३(१)(zz)(iv), ५९

भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३: कलम १२३, २२३, २७४, २७५

**मुख्य आरोपी जेरबंद!**

या बेकायदेशीर कृत्याप्रकरणी पोलिसांनी निलेश दिलीपचंद बोथरा या आरोपीला रंगेहाथ पकडून अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून १,२३,५९४ रुपये किमतीचा बेकायदेशीर व मानकांचे उल्लंघन करणारा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रशासनाचा इशारा: नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा या कारवाईनंतर अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास लासलगाव पोलीस करत आहेत.




## हवामान बदलाच्या छायेत

दर वर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन जगभर साजरा केला जातो. १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरण परिषदेनंतर या दिवसाची सुरुवात झाली आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन करण्यात येऊ लागले. पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करणे, सरकारे आणि नागरिकांना कृतीस प्रवृत्त करणे आणि पृथ्वीच्या संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न घडवून आणणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. दर वर्षी या दिनासाठी वेगळी संकल्पना निवडली जाते. यंदाची संकल्पना – "Inspired by Nature. For Climate. For Our Future' – ही हवामान बदल, निसर्ग पुनर्स्थापना आणि परिसंस्थेची सहनशक्ती यांवर केंद्रित आहे. वाढते तापमान, बदलते पर्जन्यमान आणि वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती यांच्या पार्श्वभूमीवर ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते.

हवामान बदल समजून घेण्यासाठी सर्वप्रथम हरितगृह परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. पृथ्वीवर जीवन टिकून राहण्यासाठी हा परिणाम महत्त्वाचा आहे. सूर्यापासून पृथ्वीवर येणाऱ्या ऊर्जेपैकी सुमारे ३० टक्के ऊर्जा वातावरण, ढग आणि हिमप्रदेश परावर्तित करतात, तर उर्वरित ७० टक्के ऊर्जा पृथ्वी, महासागर आणि वातावरण शोषून घेतात. महासागर सर्वाधिक उष्णता शोषून घेत असल्याने पृथ्वीचे तापमान संतुलित राहण्यास मदत होते. पृथ्वी ही शोषलेली उष्णता पुन्हा अवकाशात पाठवते. मात्र वातावरणातील काही वायू ही उष्णता अडवून ठेवतात. यांनाच हरितगृह वायू म्हटले जाते. औद्योगिकीकरण, कोळसा-तेल-गॅस यांसारख्या जीवाश्म इंधनांचा वाढता वापर, जंगलतोड आणि मानवी क्रियांमुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वाढते हरितगृह वायू पृथ्वीमध्ये अधिक उष्णता अडकवून ठेवत आहेत आणि जागतिक तापमान वाढवत आहेत. या अतिरिक्त उष्णतेपैकी ९० टक्क्यांहून अधिक उष्णता महासागर शोषत आहेत.

सन २०२४ हे जागतिक स्तरावर सर्वांत उष्ण वर्ष ठरले. २०२३ आणि २०२५ ही वर्षेही विक्रमी उष्णतेच्या यादीत अग्रस्थानी आहेत. सलग तीन वर्षे जागतिक तापमान विक्रमी पातळीवर राहणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जाते. विशेष म्हणजे २०१५ नंतरची जवळपास सर्व वर्षे इतिहासातील सर्वांत दहा उष्ण वर्षांच्या यादीत समाविष्ट झाली. २००० नंतर जागतिक तापमान वाढीचा वेग अधिक स्पष्टपणे दिसतो. औद्योगिकपूर्व काळाच्या तुलनेत पृथ्वीचे सरासरी तापमान आता सुमारे १.२ ते १.४ अंश सेल्सिअसने वाढले आहे. ही वाढ संख्या म्हणून लहान वाटली तरी तिचा परिणाम अत्यंत व्यापक आहे. महासागरांचे तापमान सातत्याने वाढत असून समुद्राची पातळीही वाढत आहे. हिमनद्या आणि ध्रुवीय बर्फ वितळण्याचा वेग वाढला आहे.

जगातील अनेक प्रदेशांच्या तुलनेत भारतात तापमानवाढ तुलनेने कमी वेगाने झाली आहे. उत्तर आफ्रिका किंवा युरोपमध्ये तापमान वाढ अधिक तीव्र दिसते, तर भारतात ही वाढ काही प्रमाणात एरोसोल्स आणि सिंचन पद्धतींमुळे कमी जाणवते. एरोसोल्स म्हणजे वातावरणात तरंगणारे सूक्ष्म कण – जसे धूर, धूळ, सल्फेट किंवा प्रदूषणातील कण. हे कण सूर्यप्रकाशाचा काही भाग परावर्तित करतात आणि त्यामुळे पृथ्वीवर पोहोचणारी उष्णता कमी होते. तथापि, एरोसोल्सचे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात आणि ते वायुप्रदूषण वाढवतात. सिंचनामुळे जमिनीतील आर्द्रता वाढते व स्थानिक तापमान काही प्रमाणात नियंत्रित राहते. तरीही भारताचा हवामान बदल स्पष्टपणे जाणवत आहे. भारतीय मान्सून अधिक अनिश्चित होत चालला आहे. कोरड्या उष्णतेच्या लाटा वाढत आहेतच; पण आर्द्र उष्णतेच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. आर्द्रता आणि उष्णता यांचे मिश्रण मानवी आरोग्यास अधिक धोकादायक ठरते, कारण शरीराला घामाद्वारे थंड होणे कठीण जाते. उत्तर भारतातील हिवाळे अधिक कोरडे होत असून हिमालयीन भागात बर्फवृष्टीचे प्रमाणही घटत आहे.

हवामान बदलाचा परिणाम केवळ तापमानापुरता मर्यादित नाही, तर तो अन्नसुरक्षा, जलसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्यावरही होत आहे. भारतातील शेती मोठ्या प्रमाणात मान्सूनवर अवलंबून असल्याने पावसातील अनिश्चितता शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होते, तर दीर्घ कोरडे कालखंड दुष्काळाची परिस्थिती निर्माण करतात. उष्णतेच्या वाढत्या लाटा कामगार, वृद्ध आणि लहान मुलांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण करत आहेत. त्यामुळे हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा नव्हे, तर अर्थव्यवस्था, आरोग्य आणि सामाजिक स्थैर्याचाही प्रश्न बनला आहे.

**– डॉ. अक्षय देवरस**

# कधी बदलणार समाजाची मानसिकता?

पुणे जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जाऊन महिलांचे बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या रॅकेटचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी मुख्य आरोपींसह काही आरोपींना पोलिसांनी अटक केली असून या गर्भलिंग निदान रॅकेटची कसून चौकशी पोलिस करत आहेत. एक डॉक्टर बेकायदेशीर गर्भलिंग निदान करत असल्याचा व्हिडिओ देखील समाज माध्यमात व्हायरल झाला असून या रॅकेटची व्याप्ती खूप मोठी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले असून या बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या टोळीने ५०० हून अधिक स्त्रीभ्रूण हत्या केल्या असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

या बेकायदेशीर गर्भलिंग निदान रॅकेटचा भांडाफोड झाल्याने सर्वत्र खळबळ माजली असून स्त्री भ्रूण हत्येचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बेकायदेशीर गर्भलिंग निदान करून स्त्री भ्रूण हत्या करणे कायद्याने गुन्हा असतानाही असे प्रकार सातत्याने घडताना दिसतात. अर्थात याला समाजाची मानसिकता कारणीभूत आहे आज २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातील आहे हेच यावरून सिद्ध झाले आहे. स्त्री भ्रूण हत्येच्या घटनांवरून सिद्ध होते की आजही आपण मुलींकडे सकारात्मक दृष्टीने पाहत नाही. केवळ ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही मुलींकडे नकारात्मक दृष्टीनेच पाहिले जाते. मुलगी म्हणजे परक्याचे धन ही अठराव्या शतकातील मानसिकता आजही कायम आहे.

मुलगी ही परक्याचे धन असल्याने तिला जन्म घेण्याचा अधिकारच नाही अशी पुरुषी मानसिकता आजही समाजातील काही लोकांत आहे जरी मुलगी जन्माला आली तरी तिला प्रत्येक पातळीवर मानहानी स्वीकारावी लागते. मुलांना हारतुरे देऊन त्यांचा लाड करणारा आपला समाज मुलींचा गळा घोटायला देखील मागेपुढे पाहत नाही. मुलांना वंशाचा दिवा म्हणतात पण मुलगी देखील वंशाची पणती आहे हे विसरून तिला विजवले जाते.

एकाच समाजाचे हे दोन भिन्न टोक विदारक चित्र दर्शवते. मुलींबद्दल आपल्या समाजात कमालीची असहिष्णुता दिसते. कधी मुलींना गर्भातच मारून टाकले जाते तर कधी जन्मल्यानंतर कचऱ्याच्या कुंडीत फेकून दिले जाते. एकीकडे दुर्गा, लक्ष्मी या देवींची पूजा करायची तर दुसरीकडे त्यांचेच दुसरे रूप असलेल्या मुलींचा मात्र दुस्वास करायचा.

ज्या देशात राष्ट्रपती, पंतप्रधान असे देशाचे सर्वोच्चपद महिलेने सांभाळले आहे त्याच देशात मुलींना जन्म घेण्याचा देखील अधिकार नाही याला काय म्हणावे ? आजही भारतीय समजात



मुलगा, मुलगी असा भेद केला जातो म्हणूनच लिंग परीक्षण, स्त्रीभ्रूण हत्या या सारखे प्रकार या देशात घडतात. आपल्या देशात लिंग परीक्षण, भ्रूण हत्येला बंदी असतानाही कधी कायद्याच्या पळवाटा शोधून तर कधी कायद्याचे रक्षक असलेल्या शासन आणि प्रशासनाचे हात ओले करून लिंग परीक्षण व स्त्री भ्रूण हत्या केली जाते म्हणूनच आपल्या देशात मुलांच्या मानाने मुलींचा जन्मदर कमी होत चालला आहे. काही वर्षापूर्वी युनायटेड स्टेट ऑफ पॉप्युलेशन फंड ( यूएनपीएफ) या लोकसंख्या विषयी अभ्यास करणाऱ्या जागतिक संस्थेने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालानुसार हा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वीच्या चार वर्षात भारतातल्या ४ लाख ६० हजार मुलींचा जन्माआधीच गळा घोटण्यात आला होता. त्यात गर्भलिंग परीक्षणात दोन तृतीयांश तर प्रसूती पश्चात मुलगी झाल्याचे कळल्याने एक तृतीयांश मुली नाहीशा झाल्या होत्या.

भारतासारख्या पुरोगामी देशाला खाली मान घालायला लावणारा हा अहवाल होता. २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातीलच आहे हे दाखवणारा हा अहवाल होता. हा अहवाल सरकारच्या देखील डोळ्यात अंजन घालणारा होता. या अहवालानंतर सरकार गर्भलिंग निदान आणि स्त्री भ्रूणहत्ये विरोधात कठोर भूमिका घेईल आणि दोषींना कठोरातील कठोर कारवाई करेल जेणे करून या घटनांना आळा बसेल अशी अपेक्षा होती पण ती अपेक्षा फोल ठरली असेच पुण्यातील या घटनेने म्हणावे लागेल. केवळ बेटी बचाओ, बेटी पढाओ अशी नारेबाजी करून मुली वाचणार नाहीत तर त्यासाठी सरकारने ठोस धोरण आखायला हवे. लिंग परीक्षण, स्त्री भ्रूण हत्ये विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करायला हवी. दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता बदलायला हवी त्यासाठी समाजाचे सातत्याने प्रबोधन व समुपदेशन करायला हवे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लोकसंख्यावाढ रोखायलाच हवी !

जागतिक पर्यावरण दिन नुकताच साजरा झाला. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे कोणत्याही देशाच्या सरकारपुढील मोठे आव्हान असते. भारतही त्याला अपवाद नाही. विज्ञानाने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे देशातील मृत्युदर कमालीचा घटला आहे याउलट वाढत्या लोकसंख्येवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरु केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीन पटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहेनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या नावावर मते मागणाऱ्या मोदी सरकारने वाढती लोकसंख्यावाढ हा विकासातील सर्वात मोठा अडथळा असल्याचे लक्षात येऊनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. या वाढत्या लोकसंख्येच्या आधारे देश जगातील चवथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनला आहे असेही काही जाणकारांचे मत आहे.

मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. ज्यामध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत. मुंबईसारख्या ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी लोकल ट्रेनमधील गर्दी पाहता त्यातील प्रवास म्हणजे मृत्यूचा खेळ झाला आहे. चालत्या गाडीतून पडल्यामुळे प्रतिदिन कितीतरी अपघात होतात; मात्र हा धोका पत्करण्याशिवाय चाकरमान्यांकडे अन्य पर्याय नसतो.

लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. झाडे तोडली जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत. शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. भूमीच्या आणि समुद्राच्या खालूनही भुयारी मार्ग आणि मेट्रो प्रकल्प उभारण्यात आले आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे. रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसनविकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. रोजगारासाठी शहरात येऊन निवृत्त झालेले नागरिक शहरांतील वाढत्या प्रदूषणामुळे निवृत्तीनंतर गावची वाट धरू लागले आहेत. शहरांतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता या विकासकामांना पर्याय नाही. त्यामुळे ग्रामीण भागांत अधिकाधिक रोजगारनिर्मिती करणे यासोबत देशातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणणे आज अत्यंत आवश्यक बनले आहे. लोकसंख्यावाढ वेळीच रोखली गेली नाही तर भविष्यात देशातील समस्त शहरे मृत्यूची केंद्रे बनल्यावाचून राहणार नाहीत.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## शिवराज्याभिषेक

शिवबा राज्याभिषेक
नव्हतो तेंव्हा आपण
रायगडाजाता जागृत
अनुभव थरारी दर्पण

स्वराज्यात स्नेहभाव
जाणवे सप्रेम घरपण
निसर्ग लुभावी अंतरा
स्व गृही नाही दडपण

कसे होते रे शिवराय
सांगेनिसर्ग कणकण
सार्थवावरछत्रपतींचा
जाग्रत करे क्षणोक्षण

राज्याभिषेकसोहळा
बोलू लागेलंआठवण
जाणा शिवइतिहासा
सुकृतचरित साठवण

शिवपोवाडा गा ऐका
उर्जा सहज संक्रमण
विचार यावा आचारां
अभिमाने मार्गक्रमण

शिवमुद्रा ठसेअंतरात
विश्ववंद्य गुण संग्रहण
भगवा हाती धरताना
स्वत्वाचे होई जागरण

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## लाडकी बहीण योजना ! अपात्र लाभार्थ्यांनी लाटले तब्बल २६ हजार कोटी रुपये

लाडकी बहीण योजना विधानसभेच्या निवडणुकी अगोदर घोषित झाली. त्यावेळी अनेक महिलांनी अर्ज केले. ज्या अटी सरकारने ठरविल्या होत्या, त्याप्रमाणे ही योजना सुरु झाली. विशेष म्हणजे स्वघोषणापत्राच्या आधारे हे अर्ज स्वीकारले गेले. त्याचा फायदा अनेकांनी घेतला. विशेष म्हणजे ही योजना केवळ लाडक्या बहिणीसाठीच होती.

पण त्याचा फायदा तब्बल चौदा हजार पुरुषांनी घेतला अनेक सरकारी नोकरीतील लाभार्थी या योजनेचा फायदा घेऊन गेले. या योजनेसाठी उत्पन्नाची अट अडीच लाख एवढी होती. तथापि या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांनी या योजनेचा फायदा गेले सुमारे २२ महिने घेतला अशांची संख्या दहा लाख एवढी प्रचंड आहे एका बातमीनुसार ५ लाख सरकारी कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे. गेल्या बावीस महिन्यात राज्य सरकारचे तब्बल २६ हजार ७३० कोटी रुपये लाटले आहेत.

अपात्र महिलांकडून रक्कम वसूल न करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे हे सारे पैसे सरकारचे म्हणजे जनतेचे आहेत जे जनतेकडून वसूल करण्यात आले आहेत. केवळ मते जातील या भावनेतून परत वसूल न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे तो कितपत योग्य आहे ? वास्तविक पाहता ज्या वेळी योजना सुरु झाली त्यावेळी त्याचे चेकिंग न करताच ती कार्यवाहीत करण्यात आली होती काय ? आज लाखो अपात्री सापडत आहेत. अनेक पुरुषांनी याचा लाभ कसा घेतला? हे सारे प्रश्न सामान्य जनतेला पडले आहेत. कारण सरकारला लोकांच्या कडून कराद्वारे पैसा जमा होतो एखाद्या योजनेची सरकारी पातळीवर कशी वाटचाल होते. हे लाडकी बहीण या योजनेद्वारे दिसून आले आहे. आता विरोधी पक्षांनी हा प्रश्न उचलून धरला आहे. या २६ हजार कोटी रुपयातून अनेक कल्याण कारी योजना राबविता आल्या असत्या येणाऱ्या अधिवेशनात विरोधी आघाडीने हा प्रश्न धसास लावला पाहिजे.

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## चनकापूर येथे ब्रह्मकुमारी तर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** वाढते प्रदूषण आणि निसर्गाचा बिघडत चाललेला समतोल पाहता पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी चनकापूर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उपस्थितांनी पर्यावरण रक्षणाची सामूहिक शपथ घेतली. मार्गदर्शन दरम्यान ब्रह्मकुमारी संगीता दीदी म्हणाल्या की, सुदृढ आरोग्य आणि शांततेसाठी स्वच्छ पर्यावरण आवश्यक आहे. प्लास्टिकचा वापर टाळणे, अधिक झाडे लावणे, तसेच पाणी आणि विजेची बचत करणे हेच पर्यावरण संरक्षणात मोठे योगदान ठरेल. या कार्यक्रमाला रमेश जैन, श्यामराव सरोदे, कपिल वानखेडे, चंद्रशेखर पानतावणे, भूषण लोणारे, नेहा भोकरे, वंदना बेले, नीरज भाई, विश्वजीत सिंग, वीरेंद्र जैन व सपना दीदी प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वांनी पर्यावरणपूरक जीवन जगण्याचा संकल्प केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्रह्मकुमारी परिवारातील बंधू-भगिनींनी सहकार्य केले.

## सैनिक बँक घोटाळा प्रकरणातील आरोपींना पुन्हा दणका

## जामीन अर्ज दुसऱ्यांदा फेटाळला

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** बहुचर्चित सैनिक बँक आर्थिक घोटाळा प्रकरणात आरोपींना पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. पारनेर न्यायालयाने आरोपींचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

या प्रकरणात यापूर्वी जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी संजय बाजीराव कोरडे व अनिल मापारी यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर चार्जशीट दाखल झाल्यानंतर आरोपींकडून पुन्हा जामिनासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, पारनेर न्यायालयाने आरोपी संजय कोरडे, निल मापारी आणि अप्पासाहेब थोरात यांचा जामीन अर्ज नामंजूर केला. सैनिक बँक घोटाळा प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार व ठेवीदारांच्या रकमेचा अपहार झाल्याचे आरोप आहेत. न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य, प्रकरणाचे स्वरूप तसेच उपलब्ध पुरावे विचारात घेऊन आरोपींना जामीन मंजूर करण्यास नकार दिल्याची माहिती मिळाली आहे.

सदर प्रकरणात सरकारी वकील ॲड.अशोक घुगे व बँकेच्या वतीने ॲड.हिलाल व कुलाल असोसिएट्स यांनी जामीन अर्जास कडाडून विरोध करत प्रभावी युक्तिवाद केला. आरोपींना जामीन दिल्यास न्यायप्रक्रिया व तपासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. तसेच ठेवीदारांच्या हितास बाधा पोहोचू शकते, असा मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे सैनिक बँक घोटाळा प्रकरणातील आरोपींना सलग दुसरा मोठा धक्का बसला असून, ठेवीदार व नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. प्रकरणातील पुढील न्यायालयीन घडामोडींवर आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जलसंधारण कामाला स्थानिकांचा हातभार; निवडुंगेवाडी तलावाचे खोलीकरण प्रगतीपथावर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गावा जवळील निवडुंगेवाडी येथील जुन्या पाझर तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे त्याची पाणी साठवण क्षमता कमी झाली होती. परिणामी पावसाळ्यातही तलावात अत्यल्प प्रमाणात पाणी साठत असल्याने टाकळी ढोकेश्वर गावातील शेतकऱ्यांना त्याचा फटका बसत होता. मात्र, आता आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशन व ग्रामपंचायतसह विविध संस्थांच्या सहभागातून सुरू केलेल्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर असून सध्या निवडुंगेवाडी तलावाचे खोलीकरण सुरू आहे.

पावसाळ्यापर्यंत हे काम सुरू राहणार असल्याने यावर्षीच्या पावसाळ्यात या तलावात मोठ्या प्रमाणात पाणी साठेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे. या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत धुमाळ वस्तीवरील स्थानिक तरुण, शेतकरी व ग्रामस्थ या अभियानात हिरहिने सहभागी झाले आहेत. तन, मन व धनाने धुमाळ वस्ती या कामात सहभागी झाली असून या कामासाठी त्यांनी आज भरीव निधी आम्ही टाकळीकरच्या पदाधिकाऱ्याकडे सुपूर्त केला. तसेच यापुढेही या कामात सर्वो तपरी सहकार्य करण्याची हमी दिली.

यावेळी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक, ज्येष्ठ पत्रकार चाँद शेख, विश्वस्त सदस्य संदीप कोरडे, स्थानिक समन्वयक संतोष सोनवळे, प्रताप खिलारी, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, आदिनाथ पायमोडे, मळगंगा तरुण मित्र मंडळाचे कार्यकर्ते योगेश धुमाळ, अतुल धुमाळ, नितीन धुमाळ, संदीप बोऱ्हुडे, निलेश चव्हाण, शिवाजी कोरडे, अंकुश धुमाळ, पोपट धुमाळ आदी उपस्थित होते.

**मदतीचा ओघ सुरूच**

या जलसंधारण कामास विविध स्तरातून मदत सुरू असून विविध क्षेत्रात कार्यरत गावातील भूमिपुत्र मदत करत आहेत. ज्या मुली लग्न करून सासरी गेल्या आहेत त्याही माहेरच्या ओढीतून या कामात हातभार लावत आहेत. एवढेच नव्हे तर चिमुकली मुले आपल्या खाऊचे पैसे या कामास देत आहेत. जेष्ठ नागरिक व सेवानिवृत्त कर्मचारी आपल्या परीने या अभियानात सहभागी होत आहेत व मदत करत आहेत.

## आता नाही तर कधी नाही, माथेरानच्या विकासासाठी हीच योग्य वेळ, रिजवाना शेख यांची भूमिका

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०५, माथेरान :** माथेरानच्या विकासासाठी सध्या अत्यंत अनुकूल वातावरण निर्माण झाले असून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले महत्त्वाचे प्रश्न आता मार्गी लागले पाहिजेत, अशी भूमिका विद्यमान नगरसेविका रिजवाना शेख यांनी सोशल मीडियावरील संदेशातून मांडली आहे. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असून माथेरान नगरपालिकेतही म हायुतीशी संबंधित पक्षांचे प्रतिनिधित्व आहे.

त्यामुळे शहराच्या विकासाशी निगडित असलेल्या विविध योजनांना गती देण्यासाठी ही योग्य वेळ असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. विशेषतः पर्यायी रस्ता, फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्प, वीज व पाणीपुरवठ्याचे प्रश्न तसेच वाहतूक व्यवस्थेतील अडचणी यावर आता ठोस निर्णय , पर्यटकांना इंटरटेनमेंट साठी प्रकल्प होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या मते, या प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास माथेरानच्या पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. स्थानिक व्यावसायिक, कामगार आणि नागरिकांना विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होतील. तसेच रोजगारनिर्मिती, व्यवसायवाढ आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील सुविधा सुधारण्यास म दत होईल.माथेरानच्या पर्यावरणाचा समतोल राखत विकासकामे राबविणे शक्य असून नियोजनबद्ध पायाभूत



सुविधा उभारल्यास शहराच्या शाश्वत विकासाला बळ मिळेल, असेही त्यांनी आपल्या भूमिकेत स्पष्ट केले आहे. विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समन्वय साधत माथेरानला अधिक सक्षम पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. केंद्र आणि राज्य शासनात समन्वयाचे वातावरण असताना माथेरानसारख्या जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळासाठी सकारात्म क दृष्टिकोनातून विचार होण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि संबंधित विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करून प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

माथेरानच्या भविष्यासाठी म हत्त्वाचे ठरणारे निर्णय आता विलंब न करता घेण्याची वेळ आली असून, आता नाही तर कधी नाही हीच भावना प्रत्येक माथेरानकराच्या अपेक्षेचे प्रतिनिधित्व करत असल्याचे नगरसेविका रिजवाना शेख यांनी आपल्या संदेशातून स्पष्ट केले आहे.

## बल्लारपुरात अवैध पिस्टल व ४ जिवंत काडतूसासह एका युवकाला अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** जिल्ह्यात अवैध शस्त्रधारकांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत बल्लारपूर शहरातील एका युवकाला देशी बनावटीचे पिस्टल आणि ४ जिवंत काडतुसांसह ताब्यात घेतले.

सलमान खान मजिद खान पठाण (वय २८ वर्षे), रा. दादाभाई नौरोजी वॉर्ड, बल्लारपूर असे आरोपीचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, दि. ४ जून २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली. यावेळी आरोपी सलमान खान मजिद खान पठाण (वय २८ वर्षे), रा. दादाभाई नौरोजी वॉर्ड, बल्लारपुर याच्या



ताब्यातून विनापरवाना बाळगण्यात आलेले एक देशी बनावटीचे पिस्टल आणि चार जिवंत राऊंड जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या अग्निशस्त्र व काडतुसांची अंदाजे किंमत ३९ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही वैध परवाना नसल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी बल्लारपूर पोलीस ठाण्यात अप. क्र. ६५१/२०२६ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ व २५ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आले असून आरोपीने हे शस्त्र कुठून आणले, त्याचा वापर कोणत्या हेतूने केला जाणार होता, तसेच या प्रकरणामागे कोणते मोठे रॅकेट कार्यरत आहे का, याचा तपास आता पोलीस करीत आहेत. आरोपीला पुढील तपासासाठी बल्लारपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या राजुरा उपविभागीय पथकाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक दिपक कांक्रेडवार, पोउपनि संतोष निंभोरकर, सफौ स्वामीदास चालेकर, पोहवा किशोर वैरागडे, पोहवा अजय बागेसर, पोअं गोपीनाथ नरोटे, शेखर माथनकर यांनी केले.

## शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या शासन निर्णयाची देवळाली प्रवरात होळी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, देवळाली प्रवरा :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या शासन निर्णयाविरोधात देवळाली प्रवरा येथील छत्रपती चौकात गुशेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या शासन निर्णयाची देवळाली प्रवरात होळीस्वारी सायंकाळी ८ वाजता शेतकरी संघटनेच्या वतीने शासन निर्णयाची प्रत जाळून निषेध आंदोलन करण्यात आले.

शासनाने जाहीर केलेली कर्जमुक्ती योजना शेतकऱ्यांच्या अपेक्षांची पूर्तता करणारी नसून पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या हातात गाजर देण्याचा प्रकार असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शेतीमालाला योग्य भाव मिळत नसताना आणि विविध आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत असताना संपूर्ण सातबारा कोरा करण्याची शेतकऱ्यांची अपेक्षा होती. मात्र, २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयामुळे त्या अपेक्षांवर पाणी फिरल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त करण्यात आली.

योजनेनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील पीक कर्जासाठी कर्जमाफी लागू करण्यात आली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळणार असला तरी दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम स्वतः भरावी लागणार आहे. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर अनुदानाची तरतूद करण्यात आली असली तरी त्यासाठी घालण्यात आलेल्या अटींमुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहतील, असा आरोप करण्यात आला. तसेच आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रिस्टॅक नोंदणीची सक्ती केल्याने प्रक्रिया अधिक क्लिष्ट झाल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

विशेषतः महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेत केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ मर्यादित ठेवण्यात



आल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. लाखो रुपयांचे कर्ज असताना केवळ ५० हजार रुपयांची मदत तुटपुंजी असून जुन्या लाभार्थी शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

यावेळी राहुरी शेतकरी संघटनेचे युवा तालुका अध्यक्ष अमोल मोढे पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, केंद्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील आणि उपाध्यक्ष अजितदादा काळे यांच्या म र्गदर्शनाखाली हे आंदोलन राज्यभर तीव्र करण्यात येणार आहे.

आंदोलनात जनुकाका शेटे, संजय काळे, साई सांगळे, प्रदीप सांगळे, सोन्याबापू मोरे, अरुण भांड, संदीप वाबळे, रितेश शिंदे, एकनाथ जंगले, वसंत थिटे, मच्छिंद्र भांड, दीपक सांगळे, बाळासाहेब शिंदे, ज्ञानदेव शेटे, बाळासाहेब खांदे, सुधीर खांदे, गंगाधर खांदे, ठकसेन गायेगाये, राहुल मोरे, अशोक भांड, पांडुरंग शेटे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी कार्यकर्ते उपस्थित होते.

शासन निर्णयातील जाचक अटी रद्द करून सर्व शेतकऱ्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

## सर्वसामान्यांच्या घरांवर अन्याय सहन करणार नाही : खा. सुरेश म्हात्रे यांचा इशारा

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** भिवंडी महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात सर्वसामान्य नागरिकांच्या घरांवर अन्याय होत असेल तर तो अजिबात सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी प्रशासनाला दिला आहे. विकास आराखडा तयार करताना धनदांडग्यांना फायदा करून देण्यासाठी जाणीवपूर्वक बदल करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

टेमघर येथील रहिवासी राजेश म्हात्रे यांच्या घराशेजारील रस्ता मूळ विकास आराखड्यात छोटा असताना, तो नंतर बदलून त्यांच्या घराकडे वळवण्यात आल्याची तक्रार करण्यात आली आहे. या बदलामुळे त्यांचे घर बाधित होत असल्याने राजेश म्हात्रे यांनी



खासदार सुरेश म्हात्रे यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडली.

यानंतर खासदारांनी थेट महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक नितीन जाधव यांच्याशी संपर्क साधून भेटीसाठी वेळ घेतली. मात्र शुक्रवारी ते पालिका मुख्यालयात पोहोचले असता संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर त्यांनी अजय साबळे यांच्याशी चर्चा करत प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका केली.

भिवंडीचा विकास आराखडा कोणाच्या फायद्यासाठी तयार केला गेला, याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही. पण त्यातून एखाद्या सर्वसामान्य कुटुंबाचे घर उद्ध्वस्त होत असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. दोन वेळा आराखड्यात बदल करण्यात आले. मोठ्या लोकांना वाचवण्यासाठी सामान्यांना त्रास देण्याचा हा प्रकार आहे, अशी परखड प्रतिक्रिया खासदार सुरेश म्हात्रे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

तसेच, आज अधिकारी कार्यालयात नसतील, पण उद्या त्यांना जाब विचारल्याशिवाय राहणार नाही. सरळ रस्ता जाणीवपूर्वक वळवण्यामागचे कारण काय, हे प्रशासनाने स्पष्ट करावे, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

# चंद्रपुरात पतंजली मेगा स्टोअरवर एफडीएची धडक कारवाई

## ४६ हजारांचा औषध साठा जप्त !




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०४, चंद्रपूर :** चंद्रपूर पतंजली मेगा स्टोअरवर अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने धडक कारवाई करत नियमांचे उल्लंघन करणारा ४५ हजार ९७० रुपये किमतीचा औषधसाठा जप्त केला. या कारवाईमुळे शहरातील औषध विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने पतंजली मेगा स्टोअरमध्ये अचानक तपासणी केली.

तपासणीदरम्यान, स्टोअरमध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या काही औषधांवर आक्षेपार्ह दावे आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आढळून आल्या. संबंधित औषधांच्या वेष्टनांवर लठ्ठपणा, दमा, हृदयविकार आणि ताप यांसारख्या आजारांवर गुणकारी असल्याचे दावे करण्यात आले होते.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'औषधे आणि जादुई उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा, १९५४' अंतर्गत अशा प्रकारच्या जाहिरातींना बंदी आहे. या कायद्यानुसार विशिष्ट आजारांवर निश्चित उपचार किंवा हमखास परिणाम दर्शविणाऱ्या जाहिराती करणे गुन्हा मानला जातो. ग्राहकांची दिशाभूल होऊ नये आणि सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण व्हावे, यासाठी अशा जाहिरातींवर कठोर निर्बंध घालण्यात आले आहेत. तपासणीत गंभीर स्वरूपाचे उल्लंघन आढळून आल्याने एफडीए च्या पथकाने संबंधित औषधांचा संपूर्ण साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या औषधांची एकूण किंमत ४५ हजार ९७० रुपये असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, संबंधित प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असून, औषध विक्रेते आणि उत्पादकांनी औषधांच्या जाहिराती व विक्री करताना कायद्याचे पालन करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.

# मीरा-भाईंदर प्रशासनाविरुद्ध शिवसेनेचा ९ जूनला महापालिकेवर 'टमरेल मोर्चा'




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०५, मीरा-भाईंद :** एकीकडे उन्हाची तीव्र झळ आणि दुसरीकडे महापालिका प्रशासनाचे ढिसाळ नियोजन. कर भरूनही जर मीरा-भाईंदरच्या जनतेला पाण्यासाठी ३ ते ४ दिवस चातकासारखी वाट पाहावी लागत असेल, तर हा नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर दरोडा आहे. जनतेच्या संयमाचा बांध आता सुटला असून, झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी येत्या मंगळवारी दि.९ जून २०२६ रोजी मीरा-भाईंदर महापालिकेवर जनतेचा विराट 'टमरेल मोर्चा' धडकणार अशी गर्जना आज मीरा -भाईंदर शिवसेना शहरप्रमुखांनी आयोजित पत्रकार परिषदेत केली.

शहरात निर्माण झालेल्या अभूतपूर्व आणि तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आज शिवसेनेच्या वतीने एक विशेष पत्रकार परिषद बोलावण्यात आली होती. यावेळी शिवसेना मीरा-भाईंदर महिला जिल्हा संघटक सौ . निशा नार्वेकर यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा यंत्रणेचे वाभाडे काढत प्रशासकीय अनास्थेवर अत्यंत कडक शब्दांत प्रहार केला.

**माता-भगिनींचे हाल; पालिकेची यंत्रणा पूर्णपणे कोलमडली!**

पत्रकार परिषदेत बोलताना शिवसेना मीरा -भाईंदर शहर महिला जिल्हा संघटक निशा नार्वेकर म्हणाल्या की, सध्या संपूर्ण मीरा-भाईंदर शहरात पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. अनेक प्रभागांमध्ये सलग ३ ते ४ दिवस पाण्याचा पत्ता नसतो आणि पाणी आलेच तर ते अत्यंत कमी दाबाने व अनियमित वेळेत येते. यामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना, विशेषतः माता-भगिनींना रात्री-अपरात्री पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. पालिकेचा पाणीपुरवठा नियंत्रण कक्ष म्हणजे केवळ 'शो-पीस' बनला असून, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणारे तिथे कोणीही नसते. या गंभीर प्रकरणासंदर्भात येत्या ९ जूनला झोपी गेलेल्या पालिका प्रशासनाला जागे करण्यासाठी आणि मीरा-भाईंदर मधील पाण्यासाठी त्रस्त झालेल्या नागरिकांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी हजारो नागरिक, माता-भगिनींसोबत 'टमरेल मोर्चा' काढणार आहोत.

पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. याच संदर्भात ९ जून रोजी सकाळी ११ वाजता भाईंदर पश्चिम येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथून सुरू होऊन थेट मीरा -भाईंदर महानगरपालिका मुख्यालय इथपर्यंत शेकडो नागरिक आणि माता-भगिनी महापालिकेवर धडकतील. अशी माहिती या पत्रकार परिषदेदरम्यान देण्यात आली. या जनआंदोलनादरम्यान निर्माण होणाऱ्या जनक्षोभाची आणि कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी केवळ आणि केवळ महापालिका प्रशासनाची राहील, असा थेट आणि स्पष्ट इशारा शहरप्रमुखांनी यावेळी दिला. या जनआंदोलनात मीरा-भाईंदरमधील सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या हक्कासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही शिवसेनेच्या वतीने पत्रकार परिषदेच्या शेवटी करण्यात आले.

या पत्रकार परिषदेत मीरा-भाईंदर शिवसेना महिला जिल्हा संघटक निशा नार्वेकर, जिल्हाप्रमुख राजू भोईर, जिल्हा समन्वयक विक्रम प्रताप सिंह, महिला जिल्हा समन्वयक प्रीती पाटील, मीरा रोड शहर प्रमुख संतोष गोळे, भाईंदर पूर्व शहर समन्वयक मनोज राणे, महिला शहर संघटक पूजा आमगांवकर, भाईंदर पश्चिम महिला शहर समन्वयक तेजस्वी पाटील, प्रवक्ता दीप काकडे आणि रामभवन शर्मा तसेच अनेक मुख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# इंधन दरवाढ आणि शेतीमालाच्या घसरत्या भावाविरोधात काँग्रेसचे अभिनव आंदोलन




अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.०५, निफाड (नाशिक) : देशात व राज्यात सातत्याने होणारी डिझेल, पेट्रोल आणि गॅसची दरवाढ, तसेच दुसरीकडे शेतीमालाचे सातत्याने कोसळणारे बाजारभाव यामुळे सर्वसामान्य जनता आणि शेतकरी पुरता होरपळून निघाला आहे. या जनसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आज निफाड येथे एक आगळेवेगळे आणि शांततापूर्ण आंदोलन छेडण्यात आले.

येथील पेट्रोल पंपावर येणाऱ्या नागरिकांना आणि वाहनधारकांना काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वतीने 'गुलाब पुष्प' आणि 'मेलोडी चॉकलेट' देऊन शांततेच्या मार्गाने या महागाईचा आणि सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवण्यात आला. काँग्रेसच्या या गांधीगिरी स्टाईल आंदोलनाने निफाडकरांचे चांगलेच लक्ष वेधून घेतले.

**उपविभागीय दंडाधिकारी व तहसीलदारांना निवेदन**

आंदोलनानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने निफाडचे उपविभागीय दंडाधिकारी (SDM) आणि नायब तहसीलदार यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. इंधन आणि गॅसचे दर त्वरित कमी करण्यात यावे, तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देऊन कोसळते बाजारभाव रोखण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी आग्रही मागणी या निवेदनाव्दारे काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली. अन्यथा यापुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

**पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती :** या अभिनव आंदोलनासाठी काँग्रेस पक्षाचे तालुक्यातील आणि जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला आघाडीच्या लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी काँग्रेस पक्ष सदैव रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असा निर्धार यावेळी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.

# छगन भुजबळ यांना राज्यसभेवर संधी देऊन केंद्रात मंत्रिपद द्यावे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार विजयी झाल्यानंतर राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी जेष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळ यांना संधी द्यावी, अशी मागणी महात्मा फुले समता परिषदेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे व पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

भुजबळ हे सध्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील वरिष्ठ कॅबिनेट मंत्री म्हणून प्रभावीपणे कार्यरत आहेत. दोन वर्षापूर्वी राज्यसभेची संधी असताना त्यांनी मागणी केली होती. मात्र, आता केवळ उरलेल्या दोन-तीन वर्षाच्या कार्यकाळासाठी राज्यसभेवर पाठवण्यापेक्षा त्यांना केंद्रात प्रभावी मंत्रीपदाची संधी दिल्यास त्या निर्णयाला खरी राजकीय आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होईल, अशी भावना ओबीसी समाजामध्ये व्यक्त होत आहे.

भुजबळ राज्यसभेवर गेल्यास गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर अनेक वर्षांनंतर ओबीसी समाजाचे नेतृत्व करणारा आवाज संसदेत घुमू शकेल. ओबीसी समाजाचे प्रश्न दिल्ली दरबारी पोहोचतील. त्यामुळे भाजपाची देखील पसंती भुजबळांच्या नावाला आहे.

ओबीसी समाजाचा आवाज राष्ट्रीय पातळीवर अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी भुजबळ यांनी दिल्लीमध्ये जाऊन नेतृत्व करावे, अशी अपेक्षा ओबीसी जनतेतून व्यक्त होत आहे. भुजबळ यांनी महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देशभरातील ओबीसी प्रश्नांसाठी नेतृत्व करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. भुजबळ हे पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाची वाट पाहत असून आता निर्णय घेण्याच्या जबाबदारीवर असल्याचेही समता परिषदेच्या वतीने सांगण्यात आले. पक्षाला ओबीसी समाजाचा वाढता विश्वास, मतांचा आलेख आणि जनाधार कायम राखायचा असेल तर भुजबळ यांना तात्काळ राज्यसभेची उमेदवारी देऊन केंद्रात मंत्रिपद मिळवून द्यावे. हा केवळ एका नेत्याचा प्रश्न नसून महाराष्ट्रातील ओबीसी समाजाच्या सन्मानाचा विषय असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

**ओबीसींच्या लढाईसाठी छगन भुजबळ संसदेत हवेत !**

● मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचे हत्यार उपसले आहे. त्यामुळे याच ओबीसी चेहऱ्याचा केंद्रात फायदा करून घेण्यासाठी लोकसभेला भुजबळांच्या उमेदवारीचा आग्रह स्वतः अमित शाहांनी धरला होता. देशभरात भुजबळांनी ओबीसींचे जाळे विणले आहे. विधानसभेला जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणावरून रान उठवूनही भुजबळांमुळे महायुतीला विशेषतः भाजपला फायदा झाला होता. जरांगे फॉक्टर भुजबळळांपुढे निष्प्रभ ठरला होता. सध्या देशात आणि राज्यात सुरु असलेल्या जातीनिहाय जनगणनेची चर्चा सुरू आहे. मात्र, जनगणनेच्या अर्जामध्ये ओबीसींसाठी स्वतंत्र ओबीसी कॉलमच नाही. अशा तांत्रिक आणि धोरणात्मक त्रुटींवर बोट ठेवण्यासाठी भुजबळांसारख्या अभ्यासू नेत्याची संसदेत गरज आहे. ओबीसी समाजाचे प्रश्न दिल्ली दरबारी मांडण्यासाठी आणि केंद्र सरकारला धारेवर धरण्यासाठी छगन भुजबळ यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि आक्रमक नेता संसदेत असणे समितीच्या हिताचे आहे.भाजप राष्ट्रवादीच्या कोट्यातून का होईना पण भुजबळांच्या नावाला पसंती देऊ शकते.

# थोडक्यात

## पर्यावरण संवर्धनाचे कृषि विद्यापीठ मॉडेल विकसीत करु - कुलगुरु डॉ.खर्चे



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, राहुरी (अहिल्यानगर) :** वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि जंगलतोड यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून त्यावर प्रभावी उपाय म्हणून वृक्षलागवड ही सर्वात सोपी आणि परिणामकारक उपाययोजना आहे. वृक्ष कार्बन डायऑक्साइड शोषून घेत वातावरण शुद्ध करतात तसेच मृदा व जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि जैवविविधतेच्या संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावतात. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि कृषि विद्यापीठाचा परिसर स्वच्छ, सुंदर व हरित करु. पर्यावरण संवर्धनाचे कृषि विद्यापीठ मॉडेल विकसीत करु असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.

आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरास प्रत्यक्ष भेट देऊन वनमहोत्सव कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा घेतला. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ.विलास खर्चे बोलत होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, उद्यानविद्या विभागाचे प्रमुख डॉ.बी.टी. पाटील, मृद व जलसंधारण विभाग प्रमुख डॉ.सचिन नांदगुडे, बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.नरेंद्र काशिद व कापुस सुधार प्रकल्पाचे वरिष्ठ कापुस पैदासकार डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ.विलास खर्चे पुढे म्हणाले की यावर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना निसर्गापासून प्रेरित हवामानासाठी, आपल्या भविष्यासाठी अशी असून हवामान बदलाच्या संकटावर मात करण्यासाठी निसर्गाधारित उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. वृक्षसंवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि कार्बन उत्सर्जन कमी करणे हे शाश्वत विकासासाठी अत्यावश्यक आहे. आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्याची हमी आहे असे मत कुलगुरु डॉ.खर्चे यांनी यावेळी व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर १ ते ७ जुलै दरम्यान साजर्या होणार्या वनमहोत्सव सप्ताहात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचे आवाहन करण्यात आले. कृषि दिनाच्या निमित्ताने वनमहोत्सव सप्ताहाद्वारे विद्यापीठ परिसरासह कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये व संशोधन केंद्रांमध्ये व्यापक वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचे महत्त्व अधोरेखित करत सर्व महाविद्यालये व संशोधन केंद्रांना सक्रिय सहभागाचे आवाहन केले. यावेळी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## खत विक्रीतील नव्या ऑनलाइन प्रणालीचे पोस्टर अनावरण



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०५, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** शेतकऱ्यांना खत वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाने सुरू केलेल्या Framework for Fertilizer Sale (FFS) या ऑनलाइन प्रणालीबाबत जनजागृती करण्यासाठी पंचायत समिती सोयगाव येथे शुक्रवार, दिनांक ०५ जून २०२६ रोजी पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण यांच्या हस्ते खत बुकिंग व खरेदी प्रक्रियेबाबतच्या माहितीपर पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांना नव्या ऑनलाइन खत बुकिंग व खरेदी प्रणालीची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या प्रणालीमुळे खत वितरणातील पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांना वेळेत व सुलभ पद्धतीने खत उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमात FFS ॲपच्या कार्यपद्धती, फायदे आणि अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील सर्व गावांमध्ये कृषी सेवा केंद्रांच्या माध्यमातून तसेच उपकृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांच्या माध्यमातून या प्रणालीची व्यापक जनजागृती सुरू असल्याची माहिती पंचायत समितीचे कृषी अधिकारी संतोष भालेराव यांनी दिली.

## जिंतूर शहर भाजप मंडळाकडून १०१ वृक्षांचे रोपण




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०५, जिंतूर (परभणी) :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याच्या पालकमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी केलेल्या वृक्षारोपणाच्या आवाहनाला प्रतिसाद देत भारतीय जनता पार्टी जिंतूर शहर मंडळाच्या वतीने तालुका क्रीडा संकुल, जिंतूर येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत यावेळी १०१ वृक्षांचे रोपण करण्यात आले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संकल्प असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमात नगराध्यक्ष प्रताप भैय्या देशमुख, गटनेते मुन्ना भैय्या गौरे, उपनगराध्यक्ष मोहसीन खान, नगरसेवक किशोर जाधव, असेफ खान, भाजप शहर मंडळ अध्यक्ष विलास भंडारे, कार्यक्रमाचे संयोजक समीर जानीमियाँ, तसेच बंटी जाधव, विजय जाधव, राजेश राठोड, शाहरुख सर, ताठे, सय्यद नसीर, संगेकर अप्पा यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान लावण्यात आलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्पही उपस्थितांनी केला. पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची आवश्यकता असून अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण होत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

जिंतूर शहर भाजप मंडळाच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत असून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. १०१ वृक्षांच्या रोपणातून जिंतूर शहराने पर्यावरण रक्षणाचा संदेश देत जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा केला.